INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील उद्योजकता आणि सिद्धी प्रेरणा ह्यांचा अभ्यास

डॉ. निलिमा अमृत दामले
आर.एस.मुंडले, धरमपेठ आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर.

प्रस्तावना :

"उद्योगाचे घरी रिद्धी सिद्धी पाणी भरी" ही म्हण सुपरिचित आहे आजचे युग केवळ औद्योगिकी करणाचे नव्हे तर जागतिकी करणाचे आहे. स्पर्धा हे या युगाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. स्पर्धेच्या या युगात जो धडाडीने, स्वतंत्र वृत्तीने, आत्मविश्वासाने पुढे जाईल तोच टिकून राहील व म्हणून उद्योजकता विकासासाठी गेल्या काही वर्षात जे शास्त्रशुद्ध प्रयत्न झाले आहेत. त्यामधून असे आढळते की, उद्योजकतेचे सुप्त गुण असलेल्या व्यक्तिंना शोधून काढणे, त्यांच्यातील गुणांची वाढ करणे व स्वतःला स्वतःच्या उद्योगातून परिपूर्ण उद्योजक निर्माण करणे शक्य झालेले आह.

**ENTREPRENEUR** हा शब्द मुळात फ्रेंच भाषेतील आहे अगदी सुरवातील लष्करी मोहीमांचे नेतृत्व करणारी व्यक्ती, ह्या अर्थाने फ्रेंच भाषेत सोळाव्या शतकात ही संकल्पना वापरण्यात आली. त्यापुढे इतर क्षेत्रातील मोहिमा अथवा धाडसांसाठी हा शब्दप्रयोग होत असे. सतराव्या शतकानंतर उद्योग व्यवसाय क्षेत्रातील धाडसांसाठी या संकल्पनेचा वापर केला गेला. फ्रेंच भाषेतील हा शब्द इंग्रजीत देखील कामाच्या बाबतीत आघाडीवर राहणारा, नेतृत्व करणारा, आर्थिक व्यवहारात स्वतःला गुंतवून घेणारा इत्यादी अर्थाने वापरला जाऊ लागला.

उद्योजक म्हणजे व्यवसायाची जबाबदारी पेलणारी अशी व्यक्ती जी लोकांना नोकऱ्या देते. चांगल्या प्रतीची संघटक असते. नवनवीन कल्पना शोधून काढणे, व्यवसायिक अनिश्चितता व आर्थिक धोका पत्करणे, स्वतःच्या अंगातील संघटन–कौशल्याने सुनियोजित पद्धतीने उपक्रम अस्तित्वात आणणे व यशस्वी करणे म्हणजे उद्याजकता होय.

महिला उद्योजकता :

देशाच्या लोकसंख्येत निम्म्या महिला आहेत. त्यांनी व्यवस्थापक कर्मचारी, उद्योजिका यापैकी कोणतीच भूमिका पार पाडली नाही तर निश्चितच देशातील अनुत्पादक व्यक्तींची संख्या वाढते. आधुनिक काळात स्त्रीवर फार मोठी जबाबदारी आहे. जोपर्यंत स्त्री पूर्णपणे खऱ्या अर्थाने शिक्षित होत नाही, आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होत नाही तोपर्यंत राष्ट्राची प्रगती होणे अशक्यच आहे. महिलांना उद्योग करायचा असेल तर चिकाटी, संयम, संवाद साधण्याचे कौशल्य, कामे हाताळण्याची हातोटी, चातुय, वास्तवाचे भान, अचूक व्यवहारज्ञान, स्वतःतील कल्पकता, सृजनशीता, सौंदर्यदृष्टी आणि नेतृत्वगुण इ. वापर करून महिलांना सहज काही उद्योग करता येतील.

जी महिला अथवा महिलांचा समुह उद्योग – व्यवसाय सुरू करण्यात पुढाकार घेते, संघटित करते आणि चालविते तिला महिला उद्योजक असे म्हणतात.

भारत सरकारच्या मते "ज्या उद्योग व्यवसायात 51% भांडवल गुंतवणूक महिलांची आहे. मालकी व नियंत्रण महिलांचे आहे आणि किमान 51% कर्मचारी महिला आहेत. अशा प्रकारच्या उद्योग व्यवसाय चालवणाऱ्या महिलेला महिला उद्योजक म्हणतात."

सिद्धीप्रेरणा (**Achievement Motivation**)

सिद्धीप्रेरणे संबंधीची संकल्पना प्रथम हेन्री मरेने (**Henry Mrrey**) 1938 मध्ये प्रस्तुत केली. त्याचा मते "एखादे कठीण कार्य हाती घेणे, कार्यपूर्तीत येणाऱ्या अडचणींना तोंड देवून यशस्वी होणे इत्यादींचा अंतर्भाव सिद्धीप्रेरणेत होतो. मॅक्लीलँडच्या (**Mc Clelland**) मते" कठीण स्वरूपाची कार्य उत्कृष्ठतेने आणि इतरांच्या तुलनेत अधिक सक्षमतेने पार पाडण्याची इच्छा असणे हे सिद्धी प्रेरणेचे व्यवच्छेदक लक्षण होय" सिद्धीप्रेरणा ही अत्यंत प्रबळ असते अशा व्यक्तीमध्ये खालील गुण आढळतात

1) हाती घेतेले कार्य चिकाटीने यशस्वी करतात.

2) यशानंतर यश या पद्धतीने या व्यक्ती प्रगती करतात

3) जोखीम पत्करून, अडचणीवर मात करतात

4) स्वः प्रयत्नांनी स्वतः मधील गुणवत्ता आणि क्षमता वाढवून परिस्थिती नियंत्रणाखाली ठेवतात.

5) इतरांपेक्षा आपण काहीतरी वेगळे करावे / अशक्यप्राय गोष्टी शक्य करून दाखवाव्यात असे सिद्धीप्रेरणा उच्च असणाऱ्या व्यक्तींना वाटत असते.

उद्योजकता आणि सिद्धीप्रेरणा

**Finney. S** ह्यांनी 1977 साली व **Singh N. P.** यांनी 1990 साली स्त्री उद्योजक आणि सिद्धीप्रेरणा यांचा अभ्यास केला तेव्हा असे दिसून आले की, स्त्री उद्योजकांची वैशिष्टये पुरूष उद्योजकांच्या वैशिष्ट्यापैक्षा बरीच भिन्न असल्याचे दिसून आले. तसेच ह्या संशोधनात स्त्री उद्याजकांच्या मानसिकतेमध्ये सिद्धीप्रेरणा कमी प्रमाणात अस्तित्वात असते व स्त्री उद्योजकांच्या प्रेरणा फार भिन्न असतात.

**Foluso, I.J., Olayinka Y.S. Olufemi, A.L.** यांनी 2013 मध्ये उद्योगिक अभिक्षमता, सिद्धीप्रेरणा आणि लिंगभेद यांचा सहसंबंध आहे काय? ह्या विषयाचे संशोधन केले असा असे दिसून आले की उद्योगिक व्यवसायात सिद्धीप्रेरणा आणि कार्यक्षमता ह्या महत्वपूर्ण भूमिका निभवतात. तसेच उद्योग क्षेत्रातील सिद्धीप्रेरणामध्ये लिंगभेद दिसून यत नाही.

उद्दिष्ट : उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या स्त्रिया यांच्यातील उद्योगशीलता व सिद्धीप्रेरणा यांचा अभ्यास करणे.

गृहीतके :

1) महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या स्त्रियांमध्ये उद्यमशीलतेत फरक नसतो.

2) महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या स्त्रियां ह्यांच्या सिद्धीप्रेरणांत फरक नसतो.

3) महिला उद्योजिका मध्ये ज्या महिलात उद्योगशीलता हा गुण असेल त्यात सिद्धीप्रेरणा हा गुण असतोच असे नाही.

<u>संशोधन पद्धती :</u>

नमुना : नागपुरातील 30 ते 45 या वयोगटातील 50 महिला उद्योजिका, 50 प्राध्यापिका अशा एकूण 100 स्त्रियांचा समावेश ह्या अभ्यासात करण्यात आला. या स्त्रिया मध्यम सामाजिक – आर्थिक गटातील होत्या. उद्योजक महिला प्रामुख्यान बुटीक, पार्लर, पाळणाघर, डेपरी, ड्रेस डिझाईनींग, घरगुती खाद्य वस्तु तयार करणे, इंटेरियर डिझायनींग, आर्टिफिशीअल ज्वेलरी मेकिंग इत्यादी व्यवसायातील होत्या.

<u>मापन साधने :</u>

या संशोधनातील गृहीतकांची सत्यता पडताळुन पाहण्यासाठी खालील मापन साधनांचा उपयोग करून आवश्यक ती माहिती प्राप्त केली.

1. **Entrepreneural Talent Scale (ETS)**

प्रस्तुत संशोधनात उद्योजकतेचे मापन करण्यासाठी सुरिला अगरवाल व इरा दास यांनी प्रमाणित केलेली (ETS) मापनश्रेणो उपयोगात आणली गेली. या मापन श्रेणीत एकूण 7 उपविभाग आहेत जे उद्योगशीलतेशी निगडीत आहेत ते पुढील प्रमाणे आहेत. 1) आव्हान/धोका स्वीकारण्याची क्षमता 2) स्पर्धात्मक वर्तन 3) नेतृत्व गुण 4) स्व संकल्पना 5) इतरांना पटवून देण्याची क्षमता 6) उद्योजकते विषयीची अभिवृत्ती 7) समस्या सोडविण्याची क्षमता

प्रस्तुत मापणश्रेणीचे गुणांकन मानक पुस्तिके नुसार करण्यात आले. **ETS** चाचणीची विश्वसनियता 0.89 असून वैद्यताही उच्च आहे.

2. <u>सिद्धीप्रेरणा मापन श्रेणी</u> **(Achievement Motivation Scale)** प्रस्तुत संशोधनात सिद्धीप्रेरणेचे मापन करण्यासाठी **ICSSR Research Project** साठी बी. एन. मुखर्जी यांनी प्रमाणित केलेली चाचणी वापरण्यात आली या चाचणीत एकूण 23 विधाने असून प्रत्येक विधानासाठी तीन पर्यायांपैकी केवळ एकाच पर्यायाची निवड व्यक्तीला करायची असते. चाचणीची विश्वसनीयता निर्देशांक 0.81 असून वैधता निर्देशांक 0.76 आहे.

<u>कार्यविधी :</u>

प्रस्तुत अभ्यासात सहभागी झालेल्या सर्व महिलांना दोन्ही मापनश्रेणी प्रत्यक्ष भेटून देण्यात आल्या व प्रदत्त गोळा करण्यात आले.

<u>फलिते व चर्चा :</u> प्रस्तुत संशोधनात मिळालेल्या प्रदत्ताचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक तसेच अनुमानात्मक सांख्यिकीचा वापर करण्यात आला यासाठी मध्यमान **(Mean)** व प्रमाण विचलन **(SD)** आणि **'t' Test** वापरण्यात आली.

प्रस्तुत संशोधनात महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील उद्योजकता मापन करण्यासाठी **ETS** ह्या मापन श्रेणीचा उपयोग केला असता, त्यांना मिळालेल्या

प्राप्तांकाद्वारे मध्यमान व प्रमाण विचलन काढण्यात आले त्याची नोंद खालील सारणी क्र. 1 मध्ये करण्यात आली आहे.

सारणी क्र. 1

महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील उद्योगशीलतते विषयीचे मध्यमान व प्रमाण विचलन दर्शविणारी सारणी

| समुह | संख्या N | मध्यमान Mean | प्रमाण विचलन S.D. |
|---|---|---|---|
| महिला उद्योजिका | 50 | 115.2 | 9.3 |
| नोकरी करणाऱ्या महिला | 50 | 108.4 | 11.35 |

उद्योगशीलतेचे मापन करतांना महिला उद्योजिका या समुहाचे मध्यमान 115.2 आणि प्रमाण विचलन 9.3 आले आहे तर नोकरी करणाऱ्या महिला ह्या समुहाचे मध्यमान 108.4 आणि प्रमाण विचलन 11.35 आहे. या दोन्ही समुहातील मध्यमान फरक दिसून येतो. या मध्यमानातील फरका वरून आपल्याला असे म्हणता येईल की महिला उद्योजिका या समुहात उद्योगशीलता ही जास्त दिसून येते. या दोन्ही समुहातील मध्यमानांतील फरक लक्षणीय किंवा सार्थक आहे का ? हे तपासून पाहण्यासाठी 't' या सांख्यिकीय चाचणीचा उपयोग केला त्याची नोंद खालील सारणी क्र. 2 मध्ये करण्यात आली.


महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील (ETS) उद्योगशीलतेचे मध्यमान प्रमाण विचलन 't' मुल्य दर्शविणारी सारणी क्र. 2

| समुह | संख्या N | मध्यमान Mean | प्रमाण विचलन S.D. | मुक्ती संख्या df | 't' गुण (ratio) |
|---|---|---|---|---|---|
| महिला उद्योजिका | 50 | 115.2 | 9.3 | 48 | 3.28** |
| नोकरी करणाऱ्या महिला | 50 | 108.4 | 11.35 | 48 | |

**0.01 स्तरावर लक्षणीय

महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिला ह्या दोन्ही समुहाच्या उद्योगशिलता मध्मांनातील फरकाची सांख्यिकीय सार्थकता 't' या मुल्यांचे 48 या df वर तपासल्यानंतर 't' मुल्य 3.28 इतके आहे व या 't' मुल्यांवरून असे लक्षात येत की 0.05 स्तरावर हा फरक सार्थक तर आहेच तसेच 0.01 स्तरांवर देखील लक्षणीय आहे. अर्थात दोन्ही समुहातील मध्यमानातील फरक केवळ योगा योगाने आलेला नसून तो खरा आहे. कारण दोन्ही समुहाचे 't' मुल्य हे **table value** पेक्षा जास्त आहे. त्यामुळे आपल्याला असे म्हणता यईल की महिला उद्योजिका या समुहात उद्योगशीलता ही नोकरी करणाऱ्या महिलांपेक्षा जास्त दिसून येते.

महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील उद्योगशीलता दर्शविणारा आलेख.




महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील सिद्धीप्रेरणेचे मापन करण्यासाठी सिद्धीप्रेरणा मापन श्रेणीचा उपयोग करून मिळालेल्या प्राप्तांकाद्वारे मध्यमान व प्रमाण विचलन काढण्यात आले. त्याची नोंद खालील सारणी क्र. 3 मध्ये करण्यात आली आहे.

सारणी क्र. 3

महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील सिद्धीप्रेरणेचे मध्यमान आणि प्रमाण विचलन दर्शविणारी सारणी

| समुह | संख्या N | मध्यमान Mean | प्रमाण विचलन S.D. |
|---|---|---|---|
| महिला उद्योजिका | 50 | 25.7 | 5.7 |
| नोकरी करणाऱ्या महिला | 50 | 18.5 | 4.5 |

सिद्धीप्रेरणेचे मापन करतांना महिला उद्योजिका या समुहाचे मध्यमान 25.7 आणि प्रमाण विचलन 5.7 आले आहे तर नोकरी करणाचा महिला या समुहाचे मध्यमान 16.5 आणि प्रमाण विचलन 4.5 आहे. ह्या दोन्ही समुहातील मध्यमान फरक दिसून येतो. ह्या मध्यमानातील फरका वरून आपल्याला असे म्हणता येईल की महिला उद्योजिका या समुहात सिद्धीप्रेरणा ही जास्त

दिसून येते. या दोन्ही समुहातील मध्यमानातील फरक लक्षणीय किंवा सार्थक आहे की नाही हे तपासून पाहण्यासाठी 't' या सांख्यिकीय चाचणीचा उपयोग केला त्याची नोंद खालील सारणी क्र. 4 मध्ये करण्यात आली आहे.

सारणी क्र. 4

महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील सिद्धी प्रेरणेचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि 't' मुल्य दर्शविणारी


| समुह | संख्या N | मध्यमान Mean | प्रमाण विचलन S.D. | मुक्ती संख्या df | 't' गुण (ratio) |
|---|---|---|---|---|---|
| महिला उद्योजिका | 50 | 25.7 | 5.7 | 48 | 6.99** |
| नोकरी करणाऱ्या महिला | 50 | 18.5 | 4.5 | | |

**0.01 स्तरावर लक्षणीय

महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिला ह्या दोन्ही समुहाच्या सिद्धी प्रेरणेच्या मध्यमानातील फरकाची सांख्यिकिय सार्थकता 't' या मुल्यांचे 48 या df वर तपासल्यानंतर 't' मुल्य 6.99 इतके आहे. व या 't' मुल्यांवरून असे लक्षात येते कि 0.05 या स्तरावर हा फरक सार्थक तर आहेच पण 0.01 स्तरावर देखील लक्षणीय आहे. अर्थात दोन्ही समुहातील मध्यमानातील फरक हा केवळ योगायोगाने आलेला नसून तो खरा आहे कारण दोन्ही समुहाचे 't' मुल्य हे **table value** पेक्षा जास्त आहे.

त्यामुळे आपल्या असे म्हणता येईल की महिला उद्योजिका या समुहात सिद्धीप्रेरणा ही नोकरी करणाऱ्या महिलांपेक्षा जास्त दिसून येते.

महिला उद्योजिका आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील सिद्धी प्रेरणा दर्शविणारा आलेख.




भारतात उद्योजकता ही प्रामुख्याने कौटुंबिक व्यवसायाशी निगडीत आहे. सामान्य माणसाचा कल नोकरी करण्याकडे अधिक आहे. परंतु बदलत्या काळानुसार स्वतंत्र व्यवसायाकडे युवा वर्ग, वळ लागला आहे. स्त्रियांचे प्रमाण जरी पुरूषांच्या तुलनेत व्यवसायांमध्ये कमी असले तरी त्यांचापण शिरकाव या क्षेत्रात झालेला आहे. प्रस्तुत अभ्यासात ज्या उद्योजक स्त्रियांचा समावेश केला होता. त्या बहुतांशी लघु, उद्योगाशी संबंधित होत्या आणि त्यांचा काही मर्यादा होत्या. जसे भांडवल, मर्यादित सोयी, मोजके मदतनीस इ. इतके असताना सुद्धा ह्या महिला उद्योजिका या समुहात उद्योगशीलता ही नोकरी करणाऱ्या महिलापेक्षा अधिक असली तरी नोकरी करणाऱ्या महिला ह्या नोकरी करून आपल्या परीवाराला आर्थिक हातभार लावतांना दिसता. नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना उद्योग करणाचा महिलांपेक्षा परिश्रम कमी करावे लागते. तर उद्योग करणाऱ्या महिलांना उद्योगातील संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. तसेच उद्योगातील बारकावे, उद्योगाबदलची अभिवृत्ती, संघटन कौशल्य जसे पैसा, वेळ आणि मार्केटिंग, मनुष्यबळ यांचे संघटन करून येग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात उद्योग व्यवसायात टिकुन राहण्यासाठी गुणवत्तेला महत्व आहे. तर उद्योग यशस्वी होऊ शकतो. उद्योग यशस्वी होण्यासाठी व्यक्तींचे हातात घेतलेले कार्य उत्कृष्टपणे पार पाडणे हे देखील आवश्यक असते आणि ह्याला आपण सिद्धीप्रेरणा असे म्हणतो. म्हणजेच आपल्या असे म्हणता येईल की कुठला ही व्यवसाय/उद्योग यशस्वी होण्यासाठी त्या व्यक्तीमध्ये उद्योगशीलता तर हवीच पण त्याच बरोबर सिद्धीप्रेरणा ही असणे हे दखील तितकेच आवश्यक आहे.

निष्कर्ष :

1) महिला उद्योजिका मध्ये नोकरी करणाऱ्या महिलांपेक्षा उद्यमशीलता अधिक असते.
2) नोकरी करणाऱ्या महिलांपेक्षा महिला उद्योजिकांमध्ये सिद्धीप्रेरणा अधिक असते.
3) महिला उद्योजिका या समुहाची महिलांमध्ये ज्यात उद्योगशीलता हा गुण होता त्यात सिद्धीप्रेरणा ही अधिक दिसून आली.

शिफारशी :

1) शासनाने महिला उद्योजकांना प्रोत्साहित करणारे धोरण जाहीर करून त्याची अंमलबजावणी करावी.
2) महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्या मार्फत अनेक कर्जपुरवठा व प्रशिक्षणासाठी योजना अमलात आणल्या पाहिजे.
3) स्त्री सबलीकरण, सक्षमीकरण, स्वयंनिर्भरता ह्यासाठी महिलांमध्ये उद्योजक निर्माण करण्यासाठी शासनाने प्रयत्न करायला हवा.

संदर्भ ग्रंथसुची :

1) डॉ. देशमुख प्रभाकर :– 'उद्योकता : विकास, संकल्पना आणि व्यवहार' पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, महाल, नागपूर.
2) डॉ. देशपांडे सु.वा :– 'सामान्य मानसशास्त्र' निराली प्रकाशन पुणे.
3) डॉ. अग्रवाल प्रवीण कुमार आणि डॉ. मिश्रा अवनीश कुमार : 'उद्यमिता के मूल आधार' साहित्य भवन पब्लिकेशन्स आगारा.
4) डॉ. अगरवाल सुरिला व डॉ. दास इरा : **Entrepreneurial Talent Scale (ETS)**
5) बी. एन. मुखर्जी : **ICSSR Research Project ACMT (Achievement Scale)**

❖❖❖❖